**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २१ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यभरात आज दिवाळीचा उत्साह; पंतप्रधानांचं देशवासियांना दिवाळीनिमित्त शुभेच्छापत्र.**
2. **पोलीस स्मृतिदिना निमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन.**
3. **तीन हेक्टर पर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी, विशेष बाब म्हणून सुमारे, ६४८ कोटी रुपये निधीच्या वितरणाला, राज्य सरकारची मान्यता.**
4. **नवीन नागपूरसाठी भू-संपादन करतांना आर्थिक मोबदल्यासह, दीड हजार चौरस फूट, व्यावसायिक भूखंड देण्याचा निर्णय.**

---------------------------------------------

**दिवाळी समग्र**

दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहानं साजरा होत आहे. आज घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये, लक्ष्मीपूजनाचा सोहळा पार पडेल. ऐकुया दिवाळीवर हा विशेष रिपोर्ट -

***(व्हॉइस कास्ट - हेमांगी)***

***व्यापारी वर्गासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या वर्षभराची खतावणी बंद करुन नवीन चोपडा सुरु केला जातो. लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं शेअर बाजारात आज मुहूर्ताच्या सौद्यांचं सत्र झालं. सत्र संपलं तेव्हा मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६३ अंकांची वाढ नोंदवत ८४ हजार ४२६ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २५ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८६९ अंकांवर बंद झाला. बाजारपेठा, घरं आणि कार्यालयं आकर्षक रोषणाईने सजवण्यात आली आहेत. विदर्भात अनेक उपक्रमांनी दिवाळी साजरी होत आहे.***

***

*बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी तालुका असलेला जळगाव जामोद इथं स्वर्गीय श्रीरामजी कुटे गुरुजी फाउंडेशनच्या वतीनं २१०० अनाथ विद्यार्थ्यांना नवीन कपडे,फराळ, आणि विविध शालेय वस्तूंचं वाटप करण्यात आलं. तर -*

*****

*दिवाळी निमित्त यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी केळापूरचे भाजप आमदार राजू तोडसाम यांनी देखील आपल्या निवासस्थानी ढेमसा नृत्याचं आयोजन केलं. दिवाळीच्या पर्वावर ग्रामीण आणि शहरी भागात आदिवासी समाज पारंपरिक गोंडी नृत्य सादर करतात. ढेमसा नृत्य आणि दंडार नृत्यात तल्लीन होत आदिवासी बांधवानी दिवाळीचा आनंद व्यक्त केला. (ढेमसा संगीत)*

******

*अमरावती जिल्ह्यात वाघबारसच्या औचित्याने आदिवासी, कोळी महादेव जमातीचं आराध्य दैवत वाघदेव अर्थात वाघोबाची पारंपरिक पूजा अर्चा करतात. पारंपरिक आदिवासी वाद्यांच्या मंगल निनादात संपन्न झालेली हि पूजा आदिवासी समाजाच्या धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि निसर्ग पूजक दृष्टिकोनाचं प्रतीक आहे. आज सायंकाळी महाराष्ट्रात घरोघरी लक्ष्मी पूजन होत आहे आणि नागपूर शहरासह संपूर्ण विदर्भ दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघाला आहे. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी हेमांगी कुळकर्णी)*

------------------------------------------

**पंतप्रधानांचे पत्र**

दिवाळीच्या निमित्तानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना उद्देशून एक पत्र लिहिले आहे. ऐकुया एक रिपोर्ट

*(व्हॉइस कास्ट - नम्रता फलके)*

*या पत्राद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. त्याचप्रमाणे स्वदेशी वस्तूंचा स्वीकार, योगाचा अंगीकार आणि स्वास्थ्याला प्राधान्य देण्याचं आवाहन देखील केलं आहे. अनेक दुर्गम भागांमध्ये नक्षलवाद आणि माओवादी दहशत पूर्णपणे नष्ट करण्यात आली असल्याचं त्यांनी या पत्रात लिहिलं आहे. अनेक लोकांनी हिंसेचा मार्ग सोडून विकासाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश केल्याबद्दल मोदींनी त्यांची प्रशंसा केली आहे. "अनेक संकटांचा सामना करत असलेल्या जगात, आपला भारत स्थैर्य आणि संवेदनशीलतेचे प्रतीक म्हणून पुढे आला आहे. लवकरच आपण जगातील*

***तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार आहोत. विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या या प्रवासात, एक जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे कि आपण देशासाठी आपले कर्तव्य पार पाडावे, आणि स्वदेशी वस्तूंचा स्वीकार करावा" असं मोदींनी पत्राद्वारे सांगितलं आहे.***

-----------------------------------------

**दिवाळी बाजारपेठ**

अलीकडे राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या दिवाळीवर, संकट कोसळलं आहे. पूर्णतः शेतीवर अवलंबून असलेल्या, वाशीम जिल्ह्यात सतत झालेल्या, अतिवृष्टीमुळे झेंडू पिकाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी पिके, पाण्याखाली गेल्यानं फुले गळून पडली, तर उरलेली झाडे रोगट झाली. परिणामी बाजारात फुलांचे दर घसरले. आज लक्ष्मी पूजनाच्या दिवशी, सायंकाळपर्यंत प्रति किलो दहा रुपये अशा दरानं विकला गेल्यानं उत्पादक हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीमुळे वाशिम जिल्ह्यातील एकूण बाजारपेठेला फटका बसला आहे. त्याचा परिणाम व्यापारी वर्गावर देखील होत आहे.

-----------------------------------------

**पोलीस स्मृतिदिन**

आज पोलीस स्मृतिदिन आहे. १९५९ मध्ये, याच दिवशी, लडाखमधे हॉट स्प्रिंग्ज इथं, सशस्त्र चिनी सैनिकांनी केलेल्या हल्ल्यात, दहा शूर पोलिसांना वीरमरण आलं. तेव्हापासून दरवर्षी, २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतल्या नायगाव इथल्या पोलीस मुख्यालयात पोलीस स्मृती स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. त्यांनी आपल्या संदेश वाचनातून, गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त झालेल्या, ३४ पोलीस अधिकारी आणि १५७ पोलीस अंमलदार अशा एकूण, १९१ वीर शहीदांना, त्यांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल श्रद्धांजली वाहिली. हे राष्ट्र पोलिसांचं बलिदान कधीही विसरणार नाही असं, मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. राज्याच्या पोलीस महासंचालक, रश्मी शुक्ला यावेळी उपस्थित होत्या. देशातल्या सर्व राज्यांमधे, पोलीस स्मृतीदिना निमित्त अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत.

-----------------------------------------

**मंत्री मकरंद जाधव पाटील**

अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना, मदत व्हावी म्हणून, राज्य शासनानं तातडीने मदत देण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी दोन हेक्टरपर्यंत मदत देण्यासाठी मान्यता दिली असून, आता या शेतकऱ्यांना तीन हेक्टर पर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठीही, विशेष बाब म्हणून, ६४८ कोटी १५ लाख ४१ हजार रुपयांच्या निधीच्या वितरणाला मान्यता देण्यात आली असल्याची माहिती, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, नागपूर विभागात, नागपूर, चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात मिळून, सात कोटी ५१ लाख ७५ हजार रुपये, अमरावती विभागात अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यात, १३१ कोटी ५६ लाख ४७ हजार रुपये, मदत देण्यात येणार आहे. आजपर्यंत मदत आणि पुनर्वसन विभागाकडून यंदाच्या खरीप हंगामातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सुमारे ८ हजार १३९ कोटी रुपये इतक्या रकमेचे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री पाटील यांनी दिली.

-----------------------------------------

**संजय राऊत**

महायुतीचा विजय हा प्रामाणिक मतांमुळे नव्हे तर, मतचोरीच्या संगनमतातून झालेला आहे, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते, संजय राऊत यांनी केला आहे. सध्याच्या मतदार यादीतील घोटाळा प्रकरणात, मोठे पुरावे असल्याचा दावा करत, त्यांनी भाजपावर मतदार यादीत फेरफार केल्याचा आरोप केला आहे. मुंबईसह महाराष्ट्र ढवळून काढत, आम्ही हे सर्व प्रकार उघडकीस आणणार आहोत असं, त्यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

-----------------------------------------

**नागपूरचा विकास आराखडा**

नवीन नागपूरसाठी ज्या शेतकऱ्यांकडून जमिनी संपादित केल्या जाणार आहेत, त्या शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मोबदला नव्हे तर प्रत्येकी दीड हजार चौरस फूट व्यावसायिक भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा आणि नागपूरच्या विकासाच्या दृष्टीने दूरगामी परिणाम

करणारा असल्याचं, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत, नागपूर महानगर विकास प्राधिकरण आणि नागपूर शहराच्या पायाभूत सुविधांशी संबंधित एकूण, २१ विषयांना मंजुरी देण्यात आली. नागपूर परिसरात सुयोग्य वाहतूक आणि संचार व्यवस्था निर्माण करण्यासाठी, बाह्यवळण मार्गाला मंजुरी, तसंच ट्रक आणि बस टर्मिनसच्या उभारणीस मान्यता देण्यात आली असल्याचं देखील बावनकुळे यांनी सांगितलं. याचबरोबर, नागपूरचे ओळखस्थान असलेल्या दीक्षाभूमी परिसराच्या विकासासाठी आणि आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटरच्या उभारणीसाठी देखील मंजुरी देण्यात आली आहे. हे दोन्ही प्रकल्प नागपूरला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

-----------------------------------------

**महादेवराव शिवणकर**

गोंदिया जिल्हा निर्मितीचे शिल्पकार आणि, राज्याचे माजी वित्तमंत्री, महादेवराव शिवणकर यांचं काल, वृद्धापकाळानं निधन झालं. आज त्यांच्यावर आमगाव इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील तसंच मध्यप्रदेश राज्यातील, अनेक आजी-माजी आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक, मोठ्या संख्येने उपस्थित होते. महादेवराव शिवणकर यांच्या दीर्घ राजकीय कारकिर्दीची आणि गोंदिया जिल्ह्याच्या विकासातील योगदानासाठी सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली.

-----------------------------------------

**राजीव देशमुख निधन**

चाळीसगाव विधानसभेचे माजी आमदार आणि, राष्ट्रवादी काँग्रेस, शरदचंद्र पवार गटाचे, प्रदेश उपाध्यक्ष, राजीव देशमुख यांचं हृदय विकाराच्या तीव्र झटक्यानं, आज निधन झालं. राजीव देशमुख यांनी २००९ ते २०१४ या काळात, चाळीसगाव विधानसभेचं प्रतिनिधित्व केलं होतं. आमदारकीपूर्वी त्यांनी, चाळीसगाव नगरपरिषदेचे, नगराध्यक्ष म्हणूनही, काम पाहिलं होतं. राजकीय वर्तुळात त्यांची एक, अभ्यासू नेते म्हणून, ओळख होती. विविध पक्षातील नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

-------------------------------------------

**शिवसेना आंदोलन**

यवतमाळ तहसील कार्यालया समोर, शिवसेना उबाठाच्या नेतृत्वात, शेतकऱ्यांनी निषेध म्हणून, चटणी भाकर खाऊन, काळी दिवाळी साजरी केली. सरकारनं कर्जमाफीचं आश्वासन पूर्ण केलं नाही. शिवाय दिवाळीपूर्वी पीक नुकसानीची मदत देखील मिळाली नाही. त्यामुळे निषेध व्यक्त करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आलं.

-------------------------------------------